वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग मंत्रालय करीता शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या १ सेवानिवृत्त लेखा संवर्गातील लेखा अधिकारी, १ सहायक लेखा अधिकारी व ५ सहायक कक्ष अधिकारी अशा ७ सेवानिवृत्त शासकीय अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने मानधन तत्वावर विवक्षित कामासाठी नामिकासूची करण्याकरीता अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव | विवक्षित कामाचे स्वरुप | भरावयाची पद संख्या संख्या | वय, अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | लेखा अधिकारी | लेखाविषयक बाबी | १ | लेखा अधिकारी पदावरील कामकाजाचा किमान ३ वर्षाचा अनुभव<br>महाराष्ट्र प्रशासकीय लेखा, लेखापरीक्षण वेतनपडताडणी इ. विषयाच्या कामकाजाचा अनुभव<br>संगणकाचे ज्ञान, टंकलेखन तसेच प्रशासकीय बाबी व तांत्रिक कामाकाजाच्या अनुभव असलेल्यांना प्राधान्य<br>वयोमर्यादा:-५८ ते ६५ वर्षे |
| २ | सहायक लेखा अधिकारी | लेखाविषयक बाबी | १ | सहायक लेखा अधिकारी पदावरील कामकाजाचा किमान ३ वर्षाचा अनुभव<br>महाराष्ट्र प्रशासकीय लेखा, लेखापरीक्षण वेतनपडताडणी इ. विषयाच्या कामकाजाचा अनुभव<br>संगणकाचे ज्ञान, टंकलेखन तसेच प्रशासकीय बाबी व तांत्रिक कामाकाजाच्या अनुभव असलेल्यांना प्राधान्य<br>वयोमर्यादा:-५८ ते ६५ वर्षे |
| ३ | सहायक कक्ष अधिकारी | १. अर्थसंकल्प विषयक बाबी<br>२. आस्थापनाविषयक बाबी<br>३. न्यायालयीन प्रकरणे संबंधित बाबी | ५ | सहायक कक्ष अधिकारी पदावरील कामकाजाचा किमान ३ वर्षाचा अनुभव<br>I. अर्थसंकल्प विषयक बाबी हाताळण्याचा अनुभव<br>II. आस्थापनाविषयक बाबी हाताळण्याचा अनुभव<br>III. न्यायालयीन प्रकरणे संबंधित बाबी हाताळण्याचा अनुभव<br>संगणकाचे ज्ञान, टंकलेखन तसेच प्रशासकीय बाबी व तांत्रिक कामाकाजाच्या अनुभव असलेल्यांना प्राधान्यवयोमर्यादा:-५८ ते ६५ वर्षे |

१. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय, दि. १०.०६.२०२५ अन्वये नमूद अटी व शर्तीच्या आधारे नियुक्ती करण्यात येईल. सदर शासन निर्णयानुसार मासिक परिश्रमिक व भत्ते निश्चित करण्यात येतील.

२. करार पध्दतीने विभागात नियुक्त केलेल्या व्यक्तींना कोणतेही पदनाम असणार नाही व अर्जित, नैमितिक व वैद्यकीय रजा अनुज्ञेय असणार नाही.

३. नियुक्तीच्या कालावधीत विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी करारपध्दतीने नियुक्ती देण्यात आलेल्या व्यक्तीची असेल.

४. करारपध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय/ वित्तीय अधिकार नसतील अशी व्यक्ती कोणत्याही शासकीय पत्र / आदेश यावर स्वाक्षरी करण्यास पात्र असणार नाही. इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी त्यांचे अर्ज, शारीरीक व मानसिक या आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असल्याचे प्रमाणपत्र, आवश्यक त्या शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या प्रमाणपत्रासह ही जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून दि १७.०२.२०२६ पर्यंत सादर करावेत.

संपर्क:- आस्थापना, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत, ९ वा मजला, नवीन मंत्रालय, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई